महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक: एमआयएस-०१२०/सी.आर.३१/२०२१/मा.तं. दिनांक: २६ ऑगस्ट, २०२२

## -: प्रसिद्धीपत्रक :-

**विषय:- भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याच्या (Opting out) प्रचलित कार्यपद्धतीमधील बदलाबाबत.**
**संदर्भ:- आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक १६ नोव्हेंबर, २०२१ रोजीचे प्रसिध्दीपत्रक**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित विविध स्पर्धा परीक्षेद्वारे पदभरतीकरीता भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (Opting out) पर्याय उमेदवारांना उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने आयोगाकडून संदर्भिय दिनांक १६ नोव्हेंबर, २०२१ रोजीचे प्रसिद्धीपत्रक जारी करण्यात आले होते. प्रस्तुत निर्णयाच्या फलनिष्पतीचा साकल्याने विचार करुन भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याच्या (Opting out) कार्यपद्धतीमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्याचा निर्णय आयोगाकडून घेण्यात आला आहे:-

(१) विद्यमान कार्यपध्दतीनुसार सर्व भरतीप्रक्रियेकरीता अंतिम शिफारशीपूर्वी सर्वसाधारण गुणवत्ता यादी (General Merit List) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

(२) स्पर्धा परीक्षेद्वारे बहुसंवर्गीय भरतीप्रक्रियेकरीता सर्वसाधारण गुणवत्ता यादीच्या आधारे प्रथम संवर्गाचा पसंतीक्रम सादर करण्यासाठी ७ दिवसांचा कालावधी संबंधित उमेदवारांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

(३) स्पर्धा परीक्षेद्वारे बहुसंवर्गीय भरतीप्रक्रियेकरीता संबंधित उमेदवाराकडून प्राप्त पसंतीक्रमाच्या आधारे प्रचलित पध्दतीनुसार तात्पुरती निवड यादी (Provisional Selection List) तयार करण्यात येईल.

(३) बहुसंवर्गीय भरतीप्रक्रिया नसलेल्या स्पर्धा परीक्षांकरीता सर्वसाधारण गुणवत्ता यादीच्या आधारे प्रचलित पध्दतीनुसार तात्पुरती निवड यादी (Provisional Selection List) तयार करण्यात येईल.

(४) तात्पुरती निवड यादी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल व त्याच्या आधारे भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा पर्याय सादर करण्यासाठी संबंधित उमेदवारांना ७ दिवसांचा कालावधी देण्यात येईल.

(५) तात्पुरती निवड यादी तसेच भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा पर्याय सादर केलेल्या उमेदवारांचा विदा (Data) लक्षात घेऊन अंतिम शिफारस यादी (Final Recommendation List) तयार करण्यात येईल.

**२.** बहुसंवर्गीय भरतीप्रक्रियेकरीता पदांचे ‘पसंतीक्रम सादर करणे’ तसेच सर्व स्पर्धा परीक्षेद्वारे भरतीप्रक्रियेकरीता ‘भरतीप्रक्रियेतून बाहेर पडणे’ याबाबतची कार्यवाही फक्त आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे विहित कालावधीमध्ये करणे अनिवार्य असेल. यासंदर्भातील इतर कोणत्याही पद्धतीने केलेल्या विनंतीचा विचार केला जाणार नाही.

**३.** भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा विकल्प सादर करण्यासंदर्भातील उपरोक्त कार्यपद्धत केवळ स्पर्धा परीक्षांकरीता लागू राहील. विशिष्ट अर्हता/विशिष्ट अनुभव आधारित सरळसेवा भरतीकरीता उपरोक्त निर्णय लागू करण्यात येणार नाही.

**४.** भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याबाबतचा सदर निर्णय सर्व प्रलंबित तसेच यापुढील सर्व स्पर्धा परीक्षांच्या निकाल प्रक्रियेपासून लागू राहील. तसेच, त्याप्रमाणे आयोगाच्या कार्य नियमावलीमध्ये सुधारणा करण्यात येईल. सदर सुधारणा होईपर्यंतच्या कालावधीत कार्यनियमावलीमध्ये सुधारणा झाली आहे; असे समजून प्रक्रिया सुरु करण्यात येईल.

ठिकाण: मुंबई

सहसचिव, माहिती तंत्रज्ञान
महाराष्ट्र लोकसेवा आयोग